| | |
|---|---|
| दाखल दिनांक | : ०८.०१.२०२५ |
| नोंदणी दिनांक | : ०६.०१.२०२५ |
| निकाल दिनांक | : १३.०१.२०२५ |
| कालावधी | : वर्षे महिने दिवस<br>०० ०० ०५ |

**न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, न्यायालय क्र. ५, बेलापुर यांचे न्यायालयात**

**(पिठासीन अधिकारी : ए.टी.बनसोड)**

**नि.फौजदारी खटला क्र.: ७४/२०२५**
**निशाणी क्र. : ३**

**महाराष्ट्र शासन**
ठाणे अंमलदार,
एन.आर.आय सागरी पोलीस ठाणे, यांचेद्वारा. **... अभियोग पक्ष**

**विरुध्द**

**शाहरुख अल्तमत शेख.**
वय : २६ वर्षे, व्यवसाय- पेंटर
रा. रुम नं.४, बाबाजी तांडेल यांची रुम,
जाट समाज मंडळाजवळ, सेक्टर-३६,
करावेगांव, सिवुड्स, नवी मुंबई. **... आरोपी**

**दोषारोप भारतीय न्याय संहिता कलम ३०९(२)**

**विधीज्ञ :** श्री. गायकवाड अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील.
ॲड. ......... आरोपीतर्फे वकील.

**: न्यायनिर्णय :**

**(दिनांक १३/१०/२०२५ रोजी जाहीर केला)**

आरोपी भारतीय न्याय संहितेचे कलम ३०९(२) अन्वये दोषारोपास सामोरे जात आहेत.

१. **अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत पुढीलप्रमाणे,**

दिनांक ०९/११/२०२४ रोजी १७:०५ ते २०:०० वाजताचे करावे गाव, सेक्टर-३६, पोदार शाळेच्या समोर, नागोरी चहा च्या बाजुला, नवी मुंबई फिर्यादी हे फोनवर बोलत असतांना आरोपी याने फिर्यादीस हिसका देउन त्यांचा मोबाईल जबरीने हिसकाउन पळुन गेला. फिर्यादी व सदर ठिकाणी काम करणा-या लोकांनी आरोपी यांस पकडून मोबाईलबाबत विचारणा केली असता त्याने तो विकला असल्याचे दुकानात विकल्याचे कबुल केले. म्हणून फिर्यादीने पोलीस स्टेशन येथे तक्रार नोंदविली.

२. आरोपी दि. ०९/११/२०२४ पासुन कारागृहात आहे. आरोपीने गुन्हा कबुल करणेबाबतचा अर्ज कारागृहातुन या न्यायालयाला टपालाने पाठविला आहे. कारागृहाला आरोपीला न्यायालयात आणण्यासाठी आदेशीत केले होते परंतु कर्मचारी उपलब्ध नसल्याने आरोपीला हजर करू शकले नाहीत. आरोपीला आज दि. १३/०१/२०२५ रोजी विडीओ कॉन्फरन्सींगद्वारे हजर ठेवण्यात आले आहे. आज रोजी आरोपीविरूध्द दोषारोप निश्चित करतेवेळी आरोपीला त्याचे गुन्हा कबुल करण्याबाबतचे विनंती अर्ज **निशाणी क्र.२** वाचुन दाखविण्यात आले. आरोपीने सदरचे **निशाणी क्र.२** वरचा गुन्हा कबुल करण्याबाबतचा अर्ज न्यायालयात पाठविल्याचे सांगितले. त्याचा गुन्हा कबुलीचा अर्ज नि.क्र.२ अन्वये दाखल केलेला आहे. आरोपीला सदर गुन्हयाबाबत विचारले असता त्यांनी सदरचा गुन्हा कबुल असल्याचे मान्य केले व त्यास कमीत कमी शिक्षा देण्याची विंनती केली.

३. आरोपीने सदर गुन्हा कबुल केला असल्यामुळे तो शिक्षेस पात्र आहे. आरोपी दि. ०९/११/२०२४ पासुन कारागृहात आहे. सदर गुन्हा आरोपीने स्वेच्छेने कबुल केलेला आहे याची खातर जमा

केल्यानंतर तसेच शिक्षेच्या मुद्दयावर दोन्ही बाजुचे युक्तीवाद ऐकल्यानंतर खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे.

**-: आ दे श :-**

१) आरोपी **शाहरुख अल्तमत शेख** यास भारतीय न्याय संहिता कायदा २०२३, कलम ३०९(२) अन्वये शिक्षेस पात्र गुन्हयाचे आरोपी करीता दोषी ठरविण्यात येत असून, भारतीय नागरीक सुरक्षा संहिता,२०२३ कलम २६४ अन्वये त्यास ०८ महिने साध्या कारावासची शिक्षा व रक्कम रू. १०००/- दंडाची शिक्षा सुनावण्यात येत आहे. दंड न भरल्यास पाच दिवसांची साध्या कारावासाची शिक्षा सुनावण्यात येत आहे.

२) आरोपींनी दि.०९/११/२०२४ पासुन आज पर्यंत न्यायालयीन कोठडीत आहे. त्यामुळे भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम ४६८ नुसार आरोपीला सदर कालावधी करिता शिक्षेत सेट ऑफचा फायदा देण्यात येते.

३) सदर प्रकरणातील जुते फिर्यादी व साक्षीदार यांना सुपुर्तनामा बंधपत्रावर सोडली असल्यास अपील कालावधी संपल्यानंतर बंधपत्र रद्द समजण्यात यावे किंवा जप्त जुते मुळ मालकास किंवा दावेदारास अपील कालावधीनंतर देण्यात यावे.

४) आरोपीला न्यायानिर्णयाची प्रत विनामूल्य देण्यात येते.

५) येणेप्रमाणे जेलरला पत्राद्वारे कळविण्यात येते.

**सही/-**
**(ए.टी. बनसोड)**
**न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,**
**न्यायालय क्र.६, बेलापुर.**

**दिनांक: १३/०१/२०२५.**
**बेलापुर.**